# पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११००५ सह आयुक्त / उप आयुक्त परिमंडळ क्र. ४

## निविदा अटी - शर्ती

सन २०१८ - २०१९ पासून क्षेत्रीय कार्यालयाकडील व मा.महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ६/४५३ दि. १८/९/२०२२ अन्वये सुधारित निविदा अटी - शर्ती

| | |
|---|---|
| 1. | सदर टेंडर नोटीस www.mahatenders.gov.in. या महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर पहावयास मिळेल. |
| 2. | A) निविदा धारकाने निविदेची फॉर्म फी व बयाणा रक्कम मनपा खात्यात पेमेंट गेटवे सिस्टीमद्वारे (ई बँकिंग) भरावयाची आहे. दीड कोटीपेक्षा कमी रकमेच्या (B-1) / (B-2) निविदांसाठी ठेकेदार यांचेकडे भारतातील कोणत्याही शासकीय विभागाकडे नोंदणीकृत असल्याचे वैध प्रमाणपत्र आवश्यक असून 'अ' पाकिटामध्ये जोडणे आहे. ठेकेदारांना कामाचे देयक E.C.S/NEFT द्वारे अदा करण्यात येतील याबाबत ठेकेदाराने मनपाचे वेबसाईटवरील जोडपत्र 'अ' मधील ई-पेमेंट साठी नमुना फॉर्म भरून देणे आवश्यक आहे. |
| | B)निविदेसोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून देणे आवश्यक असून निविदा बीड लॉक झालेनंतर निविदेसोबत खालील नमूद केलेली कागदपत्रे जोडलेली नसल्यास निविदा उघडणेत येणार.नाही व यासाठी संबंधित ठेकेदार जबाबदार राहिल. सर्व पात्र निविदाधारकांनी खालीलप्रमाणे कागदपत्रांची हार्डकॉपी एका प्रतित ७२ तासांच्या आत सादर करावी. |
| | i) आयकर भरल्याचे मागील सलग तीन वर्षाचे अद्यावत प्रमाणपत्र, पॅनकार्ड प्रत, Turnover, Bid \|Capacity [UDIN No. सह असणे आवश्यक अद्यावत Bank Solvency, GST रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र,शॉप अॅक्ट प्रमाणपत्र,ESI/PF नोंदणी प्रमाणपत्र |
| | (ii) पाणीपुरवठा व मलनिःसारण प्रकल्पाच्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/ एम. आय. डी. सी. / सिडको किंवा भारतातील कोणत्याही शासकीय विभागाकडे नोंदणीकृत असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर करणे व इतर पायाभूत सुविधांसाठी राज्यशासनाचा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा भारतातील कोणत्याही शासकीय विभागाकडे पूर्व नोंदणीकृत असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर करणे. |
| | (iii) ज्या ठेकेदारकडे वरील अ. क्र. (ii) येथील यंत्रणाकडील पूर्व नोंदणीचे वैध उपलब्ध नसेल त्यांना पुणे महानगरपालिकेने दिलेले वैध पूर्व नोंदणी प्रमाणपत्र सादर करता येईल. |
| | (iv) भागीदारी संस्था असल्यास पार्टनरशिपडिड व पॉवर ऑफ अॅटर्नी प्रत. |
| 3. | कोणतेही कारण न देता सदर कामाची निविदा नाकारणे किंवा रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या प्राधिकार्यांनी राखून ठेवला आहे... |
| 4. | अटीयुक्त निविदा सादर करता येणार नाही. |
| 5. | i)भविष्य निर्वाहनिधी कायदा १९५२, कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७० या कायद्यातील सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता स्वतः ठेकेदार यांनी करावयाची आहे. |
| | (ii) कंत्राटी कामगार (नियमन व निर्मुलन) अधिनियम १९७०नुसार ESI / PF पूर्तता करणे याची जबाबदारी ठेकेदार यांची राहिल. |
| | iii) वस्तु व सेवाकर (GST) पुर्तता करण्याची जबाबदारी निविदा धारकांवर बंधनकारक राहिल. |
| 6. | "शासनाकडील सुधारित/नविन कर भरण्याची व पूर्तता करणेची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहिल. |
| 7. | कामाचे आदेश दिल्यावर नियमानुसार रॉयल्टी देयकामध्ये रॉयल्टीची रक्कम बिलात प्रचलित दराने ठेकेदारांना अदा केली जाईल. तथापि सदर रकम ठेकेदार यांना प्रत्यक्ष अदा न करता त्याच बिलातून वजा करुन मनपामार्फत रॉयल्टीची भरणा शासनाकडे परस्पर जमा केली जाईल. |
| 8. | करारनामा स्वखचाने दिलेल्या मुदतीत करुन द्यावा लागेल. अन्यथा निविदा रद्द करणेत येईल. |
| 9. | (i)निविदा भरणाऱ्या निविदा धारकांपैकी (Tenderer ) कोणीही योग्य अर्हता धारण न करताच निविदा भरली असल्याचे निविदा उघडल्यानंतर निदर्शनास असल्यास अथवा उघड झाल्यास अशा अर्हता नसलेल्या निविदाधारकांची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. |
| | (ii) बनावट कागदपत्रे / बनावट बँक प्रतिभूती हमी बँक गॅरंटी कागदपत्रे सादर करणाऱ्या ठेकेदारांची, तसेच कार्यादेश दिल्यानंतर व नोटीस देऊनही विहित मुदतीत काम सुरु न केल्यास बयाणा रक्कम (EMD) जप्त करणेत येईल व अशा ठेकेदारांना काळया यादीत टाकण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 10. | ज्या ठेकेदारास कामाचे आदेश देण्यात येतील अशा ठेकेदारांनी सदर कामाचा कामगारांचा सर्व समावेशक विमा महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विमा निधीकडे किंवा त्यांनी नियुक्त केलेल्या वीमा कंपनीकडे उतरविणे बंधनकारक आहे. |
| 11. | मनपाने निश्चित कंलेल्या त्रयस्थ संस्था यांचेमार्फत तांत्रिक तपासणी करून त्याचागुणवत्ता पुर्वक तांत्रिक तपासणी अहवाल विहित वेळेत सदर करणे ठेकेदारास बंधनकारक असेल. |
| 12. | इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ व इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर नियम १९९८ अंतर्गत १ उपकर ठेकेदाराचे बिलातून वसूल करण्यात येईल. तसेच शासनाकडील शासन निर्णयानुसार वेळावेळी आकारण्यात येणारे कर/ फी ही ठेकेदारावर बंधनकारक असेल. |
| 13. | ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल अशांकडून करारनामा करणेपूर्वी असा ठेकेदार/ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यमान / स्विकृत सदस्य यांचेशी संबंधित नाही याची खातरजमा होणेकरिता र.रु. ५००/- चे जनरल स्टॅम्पपेपरवर संबंधित ठेकेदार/ठेकेदारी संस्थेस करुन द्यावे लागेल. |
| 14. | हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे कामांसाठी ठेकेदारांचा हॉटमिक्स प्लँट, पेव्हर, व्हायब्रेटर, रोड रोलर, वे ब्रीज व दोन कॉम्पॅक्टर इ मशिनरीज स्वतःच्या मालकीचे /भाडे तत्वावर घेवुन काम मुदतीत पुर्ण करणे बाबतची हमी ठेकेदाराने दयावयाची आहे. |
| 15. | ड्रेनेज लाईन साफसफाई करण्याच्या कामासाठी ठेकेदारांनी स्वतःची अथवा भाड्याची जेटींग मशिन असलेबाबत कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. |
| 16. | र.रु. २५ लक्ष पर्यंतच्या पूर्वगणित निविदा रक्कमेपेक्षा कमी कामांसाठी भाववाढ सुत्र व स्टार रेट लागू राहणार नाही. |
| 17. | मे. महाराष्ट्र शासन मार्फत वेळोवेळी निर्गमित आदेशानुसार मुद्रांक शुल्क भरणेची जबाबदारी ठेकेदाराची असून भविष्यात सदर शुल्कामध्ये तफावत आढळल्यास त्याचे पुर्ण दायित्व ठेकेदारांवर असेल याची नोंद घ्यावी. |
| 18. | ठेकेदाराने खालीलप्रमाणे हमीपत्र र.रु. ५००/-च्या स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करून देणे बंधन कारक आहे. |
| | (अ) ठेकेदाराने प्लांट आणि मशिनरीबाबत भाडेतत्त्वावर घेवुन मुदतीत काम पूर्ण करणेबाबतची हमी. |
| | (ब) सदर कामास Arbitration clause लागू होणार नाही. याबाबत ठेकेदाराने कोणत्याही लवादाकडे दाद मागणार नाही व याबाबत अंतिम निर्णय मा.महापालिका आयुक्त यांची राहिल अशी हमी देणे बंधनकारक आहे. |
| | क) ठेकेदाराने कुठल्याही प्रकारची बनावट व चुकीची कागदपत्रे सादर न केलेबाबतची हमी देणे बंधनकारक आहे. |
| | (ड) ठेकेदार कोणत्याही शासकीय/निमशासकीय संस्थेमध्ये काळया यादीत समाविष्ट न झाल्याबाबत हमी देणे बंधनकारक राहिल. सदर काळया यादीत समाविष्ट झालेला कालावधी निविदा जाहिरातीच्या दिनांकापूर्वी संपलेला असणे आवश्यक आहे. |
| | इ) ठेकेदार/ ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यमान/ स्विकृत सदस्यांशी संबंधित नाही याची खातरजमा होणेकरिता संस्थेस प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे. |
| | (ई) दिलेले काम मुदतीत व गुणवत्तापूर्वक पूर्ण करणार याबाबतचे हमीपत्र देणे बंधनकारक आहे. |
| | उ) Additional Performance Security Deposit ची रक्कम NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहिल. अनुषंगाने आवश्यक रकमेच्या डी. डी. पाकीट 'ब' मध्ये जोडला असलेबाबत तसेच दरपृथ्थकरण जोडणेबाबतचे हमीपत्र सादर करणे. |
| 19. | टेंडर अटीशर्तीमध्ये दोन क्लॉज मध्ये विसंगती आढळल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय खातेप्रमुख यांचा राहील. |
| 20. | **DLP Period-**<br>1) Footpath work- 2 yrs, 2) Asphalt work- 3 yrs, 3) Concrete work- 5 yrs, 4) Maintenance Work-2 Yrs, 5) Thermoplastic Paint & Signage - 2yrs, 6) DRAINAGE WORK-2 Yrs, 7) Bhavan -2 Yrs. |
| 21. | The contractor has to strictly upload the documents in particular folders as per prescribed format only. During the scrutiny, under any circumstances if there is mismatch in uploading of documents or if the concerned officer is unable to trace the document, the contractor will be held responsible and the contractor will be liable to disqualification. |
| 22. | Only L1 Contractor have to be submitted all the uploaded documents plus Additional performance security deposit in the form of NEFT/ RTGS and rate analysis, in sealed envelope in hard copies to the concerned department within 72 hours after opening the |

| | |
|---|---|
| | tender. The contractor will be held responsible for this. |

| | | |
|---|---|---|
| 23. | ई निविदा प्रसिद्धी यापुढे mahatenders.in या NIC च्या व शासनाने विशिष्ट आदेश दिल्यास योग्य या web portal पर प्रसिद्ध कराव्यात केंद्र शासनाने मंजूर केलेल्या कामासाठी केंद्र शासनाच्या प्रसिद्धी निकषांचे अनुपालन करावे. | |
| 24. | इसारा रक्कम (EMD)<br>इसारा रक्कम Online RTGS/NEFT द्वारे संबंधीत कंत्राटदाराच्या बँक खात्यातून सर्व रकमेच्या कामा करीता भरणे बंधनकारक राहील.<br>i) रु.१.५० कोटीपर्यंतची कामे: -निविदा रकमेच्या १%<br>ii) रु.१.५० कोटी रकमेवरील कामे निविदा रकमेच्या ०.५% किंवा रु. १.५० लक्ष यापैकी जास्त असेल ती रक्कम | |
| 25. | सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit)<br>निविदा रकमेच्या ५ % मनपाचे प्रचलित धोरणानुसार ( EMD to be converted in to SD and remaining to be recovered from 1st 3 RA bills)<br>5% SD Defect liability period नंतर अदा करण्यात येईल.. | |
| 26. | रुपये २.०० लक्ष पेक्षा जास्त रकमेच्या सर्व कामांसाठी खालीलप्रमाणे पात्रता निकष, | |
| अ) | मागील वर्षातील कंत्राटदाराची कमाल उलाढाल | देय असलेल्या कामाच्या वार्षिक किमतीच्या कमीत कमी ७५ टक्के इतकी असावी (वार्षिक किंमत) = (कामाची एकूण किंमत) (कामाचा कालावधी वर्षात) |
| ब) | मागील ५ वर्षात, कंत्राटदाराने त्याच देय कामांच्या किमतीनुसार (प्रचलित स्वरूपाच्या तुल्यबळ किमतीच्या पूर्ण केलेल्या कामाची किमान किंमत. | देय कामांच्या किमतीनुसार (प्रचलित दराने)<br>अ.तीन सारख्या पद्धतीची कामे ज्याची कामनिहाय किंमत, बोलाविण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ४०% पेक्षा कमी नसावी किंवा<br>ब. दोन सारख्या पद्धतीची कामे ज्यांची कामनिहाय किंमत, बोलावण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ५०% पेक्षा कमी नसावी किंवा<br>क. एक सारख्या पद्धतीने काम ज्याची किंमत, बोलाविण्यात आलेल्या निविदेच्या अंदाजित रकमेच्या ८०% पेक्षा कमी नसावी.<br>(टीप : बोलविण्यात आलेल्या निविदा रक्कम म्हणजे Estimated cost put to tender) |
| क) | देय कामासाठी मागील ५ (पाच) वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात ज्या महत्वाच्या परिमाणाच्या बाबी करावयाच्या आहेत. त्याचे कमीत कमी परिमाण | देय कामातील महत्वाच्या बाबींच्या परिमाणाच्या ३०%. या बाबतीत निविदे अंतर्गत महत्वाच्या व आवश्यक (जास्त परिमाण असणा-या कमाल पाच व किमान तीन ) बाबींचे परिमाण नमूद करण्यात यावे व या बाबींची एकूण किंमत निविदा किंमतीच्या ३०% पेक्षा जास्त रकमेची नसावी. |
| ड) | कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता (बीड कपॅसिटी) | (अेx एनx १.५ ) - बी<br>जिथे अे- गेल्या ५ (पाच) वर्षातील जास्ती जास्त वार्षीक उलाढाल (चालू दराने)<br>एन- देय कामाचा कालावधी<br>बी- हातातील कामांची किंमत (देय कामांच्या कालावधीतील) |
| | बन्याचदा आढळून आले आहे की, एकाच निविदा सूचनेतील बहुसंख्य अथवा सर्व कामांकरीता एकच कंत्राटदार निविदा सादर करतात. अशावेळी कंत्राटदाराचा आर्थिक देकार उघडल्यानंतर बीड कपॅसिटीच्या पात्रतेनुसार बीड कपॅसिटी रकमेपर्यंतच्या कामासाठी कंत्राटदारास पात्र ठरविले जाते. ज्यावेळी अशी बाब निदर्शनास येईल त्यावेळी संबंधित कंत्राटदाराने संबंधित प्रादेशिक विभागात सादर केलेल्या सर्व निविदा विचारात घेऊन बीड कपॅसिटी परिगणित करून कंत्राटदाराकडून प्रथम प्राधान्यक्रम घेवून त्यानुसार बीड कॅपॅसिटीच्या मर्यादेपर्यंतच निविदांचे आर्थिक देकार उपडण्यात यावेत.<br>Where A = Maximum value of the civil engineering works executed in any one year during the last five years (Updated to ----- - level ) taking into account the completed as well as | |

| | |
|---|---|
| | works in progress<br>N-Number of years prescribed for completion of the works for which bids are invited<br>B= Value at ------- price level, of existing commitments and on going works to be completed during the next------years (Period of completion of the works for which bids are invited.)<br>Note: The statement showing the value of existing commitments and on-going works as well as the stipulated period of completion remaining for each of the works listed should be counter signed by the Engineer-In Charge not below the rank of an Executive Engineer / Officer in charge. In Support of this, attested copy of Annual Audit Report certified by the Charted Accountant should be produced, and same should be verified by auditor of PMC |
| इ) | देय कामाच्या विशिष्ट स्वरुपानुसार समकक्ष काम (समकक्ष काम म्हणजेच कामानुरुप काम शासकीय अथवा निम शासकीय कार्यालया अंतर्गत केलेली कामे ) कंत्राटदारांनी प्रत्यक्ष काम पुर्ण केलेले असणे अनिवार्य आहे. सबलेट (sublet) केलेली कामे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. |
| ई) | देय कामासाठी कंत्राटदाराकडे उपलब्ध असावयाची स्वतःच्या मालकीची यंत्रसामुग्री अथवा स्वसाक्षांकित व नोटरीकृत भाडेतत्वावर घेतलेली यंत्रसामुग्री व प्रकल्प व्यवस्थाबाबतची व्यवस्था असलेबाबत संबधित ठेकेदाराने हमीपत्र जोडणे आवश्यक आहे. कामाच्या स्वरूपा नुसार लागणारी यंत्रणा सामुग्री पुरविणे बंधनकारक आहे. |
| | १. उलाढाल, कामाची किंमत इत्यादीची परिगणना चालू दराने करताना प्रतिवर्षी १०% वाढ विचारात घेण्यात यावी.<br>२. उपरोक्त (क) नुसार बाबींची निवड करताना देय कामामधील महत्वाच्या व ठळक बाबी विचारात घ्याव्यात.<br>३. हातातील कामांची उर्वरित किंमत बिनचूक व परिपूर्णरीत्या सादर करणे कंत्राटदारांवर बंधनकारक राहील तसेच, देय कामासाठी निविदा सादर केल्या नंतर पण त्यासंबंधी अंतिम निर्णय होण्यापूर्वी एखादे नवीन काम मिळाल्यास त्यासंबंधीची माहिती त्वरीत सादर करणे देखील कंत्राटदारांवर बंधनकारक राहील अन्यथा नियमानुसार ते यथोचित कारवाईस पात्र राहतील. |
| 27. | पंजीकृत कंत्राटदारांबाबत सूचना :<br>१) रु.१.५० कोटी पर्यंतच्या रकमेच्या निविदांकरीता कंत्राटदार नोंदणी (पंजीकृत) आवश्यक आहे. भारतातील कोणत्याही शासकीय / निमशासकीय याचे कडील पूर्व नोंदणी असल्याचे वैध प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२) रु. १.५० कोटीपेक्षा जास्त रकमेच्या निविदांकरीता कंत्राटदार पंजीकृत असण्याची आवश्यकता नाही. |
| 28. | स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी सर्व कंत्राटदारांना SBD (Standard Bid Document) निविदा वाचन बावनिहाय दरपृथःकरणे सादर करणे अनिवार्य राहिल. ठेकेदाराचा दर १०% व १०% पेक्षा जास्त कमी असल्यास संबंधित ठेकेदाराकडून बाबनिहाय दर पृथ:करण सादर करणे अनिवार्य राहील. |
| 29. | तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अथवा जोडलेल्या विवरणामध्ये काही शंका असल्यास संबंधीत कंत्राटदाराकडुन त्यांचे स्पष्टीकरण घ्यावे, अश्या प्रकरणी पुरक विवरण /प्रमाणपत्र तसेच जास्तीची माहिती ग्राह्य करून ती अभिलेखावर ठेवावी. व तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपूर्ण आहे. तांत्रिक लिफाफ्यातील माहिती अपूर्ण असल्यास ती वरील प्रमाणे विशिष्ट कालावधीत ८ दिवसात उपलब्ध करून देण्यात यावी व याकरीता कंत्राटदार असमर्थ ठरल्यास नंतर त्यास अपात्र ठरवण्यात येईल व तसे त्यास लेखी कळवून नंतर निविदा उघडण्याची कार्यवाही करावी. |
| 30. | तांत्रिक लिफाफ्याच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने "माझा आर्थिक देकार उघडण्यात येवू नये" अथवा "मी स्पर्धेतून माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवून त्याचा आर्थिक देकार उघडण्यात येईल. |
| 31. | कंत्राटदार एकमेकांविरुध्द तक्रार करत असतील अथवा हरकती (Objections ) घेत असतील तर १५ कोटी किंमतीपर्यतच्या कामांसाठी मा. खातेप्रमुख व रु १५ कोटी पेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी निविदा मा अति. महा आयुक्त यांच्याकडे आवश्यक कागदपत्रासह संदर्भ करून निर्णय घेण्यात येईल. मा. अति महा. आयुक्त यांचा निर्णय दोन्ही बाजूस अंतिम व बंधनकारक राहील.<br>अतिरिक्त सूचना:- निविदा प्रक्रिये बाबत ठेकेदाराच्या काही तक्रारी / हरकती / म्हणणे असेल तर ते टेंडर उघडल्या पासून ३ कार्यालयीन दिवसांमध्ये संबंधित खात्यामध्ये तक्रारी / हरकती/ म्हणणे लिखित स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा तकार ग्राह्य धरली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| 32. | आर्थिक देकार उघडल्यानंतर निविदा प्रक्रियेत निविदा प्राप्त कंत्राटदाराने अथवा अन्य कंत्राटदारांनी खोटी / बनावट कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यास जोडून निविदा मिळवण्याचे / निविदा प्रक्रियेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ ह्या कंत्राटदारास / कंत्राटदार भागीदारीस अथवा कंपनीस/ संयुक्त कंपनी (JV/LLP / Pvt Ltd Public Limited Company) असल्यास संबंधीत कंपनीस १५ दिवसांची नोटीस देऊन काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करून त्यास website वर प्रसिद्धी देऊन पुणे महानगरपालिकेच्या काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल व पुणे महानगरपालिकेच्या निविदा प्रक्रियेत भाग घेण्यास प्रतिबंध राहील. |
| 33. | प्राप्त निम्नतम निविदेचा देकार पुर्वगणित निविदा रक्कम (Estimated cost put to tender) पेक्षा कमी असेल तर -<br>१) अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit)<br>निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना रद्द करण्यात येत असून लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर प्रथम न्यूनतम देकार सादर करणा-या L-१ निविदाकाराने महापालिका आयुक्त यांचे नावे असलेला "Additional Performance Security Deposit" आठ दिवसाच्या आत संबंधित खात्याकडे जमा करण्यात यावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.<br>२) प्रथम न्यूनतमदेकाराच्या (L-1) निविदाकाराने वरील विहित मुदतीत Additional Performance Security Deposit चा भरणा केला नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L-2) निविदाकारास लेखी विचारणा करून L- 2 निविदाकार L-1 पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.<br>३) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रकमेसाठी दोन पटीने रक्कम NEFT/ RTGS द्वारे सादर करणे अनिवार्य राहील. उदा. १९% कमी दरासाठी खालीलप्रमाणे पृथ:करण:<br>१०% कमी दरापर्यंत १% (देकार अँटपार पेक्षा जास्त कमी ते १०% कमी दरापर्यंत असल्यास १% (एक टक्का रकम NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहील.)<br>व<br>१५% पर्यंत कमी दरापर्यंत - (१५% - १०% = ५%)<br>तसेच (१९-१५) = ४% करीता (४X२= ) ८%<br>असे एकूण (१+५+८) = १४%)<br>Additional Performance Security Deposit ची रक्कम रुपये १०००/- पेक्षा कमी असल्यास किमान रुपये १०००/- (एक हजार) चा NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहिल.<br>४) Additional Performance Security Deposit ची रक्कम भरताना कंत्राटदाराची निविदा देकार दोन दशांश पर्यंत ग्राह्य धरून (Rounded up to two decimal points) त्याप्रमाणे रक्कम परिगणीत करण्यात यावी.कंत्राटदाराने काम समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर निविदेतील तरतुदींप्रमाणे ठेकेदाराकडून प्राप्त अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit )कंत्राटदारांना अंतिम देय अदा केल्यानंतर खात्यामार्फत परत करण्यात येईल. |
| 34. | अतिरिक्त सूचना :- न्युनतम देकार (एल-1) ठेकेदाराने विहीत मुदतीत Additional performance security deposit चा भरणा न केल्यास L-1 ठेकेदारास 1 वर्ष पुणे महानगरपालिकेची कामे घेण्यासाठी बंदी करण्यात येईल. व त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल तसेच सदर ठेकेदारास अपात्र समजले जाईल. |
| 35. | सदर Additional Performance Security Deposit ची रक्कम संबंधित ठेकेदाराच्या बँक खात्या मधुन NEFT/RTGS द्वारे भरणा करणे अनिवार्य राहिल.<br>वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / NEFT/RTGS सादर करणा-या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल. व संबंधीत कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात येईल. काळया यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडण्यात येणार नाही. |
| 36. | निविदेच्या विधीग्राह्यता कालावधी- (Validity Period) निविदेतील कंत्राटदाराने भरलेल्या दरासाठी विधिग्राह्यता कालावधी निविदा स्वीकृती च्या अंतिम दिनांकपासून १२० दिवस राहील. तथापि निविदेची विधीग्राह्यता निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहिल. आवश्यकता असल्याम कंत्राटदाराकडून निविदा विधीग्राह्यता वाढवून देण्यात येईल. |
| 37. | काही कंत्राटदार निविदा सादर केल्यानंतर म्हणजेच Bid lock झाल्यानंतर तांत्रिक लिफाफा उघडताना त्यांचा लिफाफा २ उघडण्यात येऊ नये असे लेखी पत्राव्दारे निविदा समितीत/संबंधितांस कळवितात, त्यामुळे |

| | |
|---|---|
| | कंत्राटदारांचे संगनमत (Cartel Formation) झाले. असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी संबंधित कंत्राटदारांना लिफाफा २ उघडण्यात येईल व आर्थिक देकार उघडल्यानंतर संबंधित कंत्राटदार पात्र ठरल्यास कार्यारंभ आदेश देण्यासंदर्भात नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन अशा कंत्राटदारास पुणे मनपातील सर्व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यास एका वर्षासाठी प्रतिबंध करण्यात येईल, यासंबंधी संबंधित खातेप्रमुख यांना पूर्ण अधिकार राहतील अशा निविदा प्रक्रीयेमध्ये अन्य कालावधीची फेरनिविदा मागवून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. |
| 38. | In case the lowest tendered amount of two or more contractors is same<br>48 In case the lowest tendered amount (estimated cost+ amount worked on the basis of percentage above/below) of two or more contractors is same such lowest contractors will be asked to submit sealed revised offer in the form of letter mentioning percentage above/ below on estimated cost of tender including all sub sections /sub heads as the case may be but the revised percentage quoted above/ below on tendered cost or on each sub section / sub head should not be higher than the percentage quoted at the time of submission of tender. The lowest tender shall be decided on the basis of revised offers<br>In case any of such contractor refuses to submit revised offer, then it shall be treated as withdrawal of his tender before acceptance and 50% of earnest money shall be forfeited.<br>If the revised tendered amount of two or more contactors received in revised offer is again found to be equal, the lowest tender among such contactors shall be decided by draw of lots in the presence of of the circle, EE(s) incharge of work. |
| 39. | महाराष्ट्र शासन यांचेकडील नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंता ठेकेदारांना खालीलप्रमाणे अटी-शर्ती सवलत लागू राहील:<br>सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्वसाधार अनेक ठिकाणी देण्यात आलेल्या सवलती चा आभ्यास करून व आवश्केतनुसार त्यामध्ये अल्पसा बदल करून पुणे महानगरपालिकेत पुढीलप्रमाणे अंमलबजवणी करणेत येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत दीड कोटी मार्यादेपर्यंत कामे करणेसाठी नोंदणीप्रमाण पत्र देण्यात आले आहेत. तथापी पुणे मनपाकडील कार्यक्षेत्र व कामांचे स्वरूप या बाबींचा विचार करता थेट १.५० कोटीपर्यंतची pकामे न देता प्रथम सुशिक्षित बेरोजगार यांना २५ लाखापर्यंतच्या कामांसाठी निविदा सादर करणेस पात्र राहतील. उर्वरित सवलती खालीलप्रमाणे आहेत.<br>१. सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे नोंदनी करून नोंदणी प्रमाणपत्र निविदा भरताना सादर केल्यास, एक काम र.रु.२५ लाख किंवा जास्तीत जास्त सहा कामे असे एकुण रक्कम रूपये १.५० कोटी मर्यादेपर्यंतची कामे घेता येतील. या कामांसाठी अनुभव, उलाढाल या अटीमध्ये सूट देणेत येऊन निविदा भरणेसाठी पात्र समजणेत येईल.<br>२.सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना सर्व कामांना सुरक्षा अनामत रकमेमध्ये देशात येणारी ५०% सुटबाबतची अट रद्द करणेत येऊन मुद्दा १ नुसार प्रथम मिळालेल्या सहा किंवा रक्कम रु. १.५० कोटी पर्यंतच्या कामासाठी अनामत रकमेमध्ये ५०% सुट अनुज्ञेय राहील, पुढील निविदासाठी सर्वसाधारण ठेकेदारांप्रमाणे ५% सुरक्षा अनामत निविदा अटी शर्ती प्रमाणे भरावी लागेल.<br>सदर सुशिक्षित बेरोजगार / अभियंता हि सवलत यांना र.रु. १.५० कोटी पर्यतच कामासाठी अथवा नोंदणी दिनांका पासून पाच वर्ष पर्यंत राहील त्यापैकी जे प्रथम येईल तो पर्यंतच सदर सवलत लागु राहिल. |
| 40. | इ-निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र ५००/- रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर ठेकेदाराने लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.<br>• निविदेतील लिफाफा क्र. १ मध्ये तसेच निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास ठेकेदार पुर्णपणे जबाबदार राहतील, पुणे महानगरपालिकेचे निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत.<br>• खोटया व बनावट कागदपत्राआधारे निविदा भरली असल्याचे उघड झाल्यास सदर ठेकेदाराची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | • ठेकेदाराने जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट आढळल्यास अशा ठेकेदाराची निविदा अपात्र ठरविण्यात येऊन त्यास काळया यादीत टाकण्याची तसेच सदर ठेकेदारा विरुद्ध भा.दं.वि.स. अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंदविण्याची कारवाई करण्यात येईल. कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट आढळुन आल्यास त्यासाठीही संबंधित ठेकेदार भा.दं.संहितेच्या विविध कलमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द करून ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात येईल. | |
| 41. | कार्यादेश मध्ये नमूद केलेल्या कालावधीत काम न झाल्यास प्रती दिन निविदा रकमेनिहाय खालीलप्रमाणे दंडात्मक कार्यवाही निविदा अटीप्रमाणे केली जाईल. अशा स्वरुपाची कामे करताना ठेकेदार यांनी किंवा त्यांचे जबाबदार अधिकृत प्रतिनिधी कनिष्ठ अभियंता / उप अभियंता यांचेशी नियमित संपर्क व समन्वय राखणे आवश्यक आहे. व केलेल्या कामांचा संक्षिप्त अहवाल सादर करणे बंधनकारक राहिल. | |
| | Details | Amount |
| 1) | Amount of liquidated damages for delay in completion of works. | For whole of work (1/2000) th of the initial contract price, rounded off to the nearest Thousand, per day. |
| 2) | Maximum limit of liquidated damages for delay in completion of works. | 10 percent of the initial contract price rounded off to the nearest thousand. |
| | प्रतिदीन दंड मुळ कामाच्या रक्कमेच्या १/२००० प्रमाण इतकी (म्हणजे ०.०५% व नजीकच्या एक हजारांच्या पुर्णांकात ) आणि दंडाची कमाल रक्कम मर्यादा १०.०० % इतकी अशा प्रकारे राहील. | |

(सचिन घुले)
वरीष्ठ लिपिक
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( नितीन पिसाळ)
वरीष्ठ लिपिक
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( प्रतिक दळवी)
कनिष्ठ अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

(सोमनाथ वासकर)
कनिष्ठ अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( ज्ञानेश्वर सोनवलकर)
कनिष्ठ अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( गिरीष धाबेवार)
कनिष्ठ अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

(प्रविण कळमकर)
कनिष्ठ अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( सुनील पाटील)
उप अभियंता
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

( बाळासाहेब ढवळे पाटील)
महापालिका सहाय्यक आयुक्त
महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
हडपसर-मुंढवा, पुणे महानगरपालिका

ण - १७

अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. : अति-मआ (वि)/पत्र/ ८८२०
दिनांक : 20/11/23

<u>कार्यालयीन परिपत्रक</u>

विषय : "पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र" नुसार मंजूर निविदा अटी- शर्तीतील अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) स्वीकारण्याबाबतचे सुधारित आदेशा बाबत.

संदर्भ : १. "पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र" -मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.६/४५३ दि.०८/०९/२२ व त्यावरील आज्ञापत्र जावक क्र.मआ/पथ/५२२८ दि. २९/०९/२०२२

२. महाराष्ट्र शासन , सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि. ०७ मार्च २०१९ मधील अ.क्र. १.

३. मुख्य अभियंता पथ जावक क्र. पथ/६७२२ दि. २७/०९/२३ चे निविदावरील मा.महा. आयुक्तांचा मान्यतेचा ठराव क्र. ६/५७९ दि. ०३/११/२०२३

संदर्भ क्र. १. "पुणे महानगरपालिका निविदा कार्यप्रणाली प्रपत्र"मान्य निविदा अटी- शर्ती प्रणालीनुसार सदयस्थितीत निविदा चे कार्यवाही करण्यात येत आहे तथापि संदर्भ ३. अनुसार काही जाचक अटी- शर्ती रद्द करणे करिता ठेकेदाराच्या पत्राच्या अनुषंगाने पथ विभागामार्फत , सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक संदर्भ क्र.०२ अन्वये मा.महापालिका आयुक्त यांजकडे निवेदन सादर करण्यात आले होते . सदर निवेदनास मा. महाआयुक्त ठराव क्र. ६/५७९ दि. ०३/११/२०२३ अन्वये मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता प्राप्त झाली आहे.

संदर्भ क्र. ०३ मध्ये नमूद मा. महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेनुसार अतिरिक्त सुरक्षाठेव रक्कमेबाबत खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहे .

१. संदर्भ क्र. १. नुसार अतिरिक्त सुरक्षाठेव रक्कम DD द्वारे सादर करणे अनिवार्य होते. तथापि यापुढे सदर अतिरिक्त सुरक्षाठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) ची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या DD/FDR/BG स्वरुपात स्वीकारण्यात यावी.

उपरोक्त नमूद नुसार बाबीची अंमबलबजावणी या कार्यलयीन परिपत्रकाच्या दिनांका पासून पुढील प्रसिध्द होणाऱ्या निविदांसाठी करण्यात यावी. पूर्वलक्षी प्रभावाने अंमलबजावणी करण्यात येवू नये.

20/11/23

(विकास ढाकणे)
अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (वि)
पुणे महानगरपलिका

प्रत :- १. मा.महापालिका आयुक्त , पुणे मनपा
२. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज/ई)
३. सर्वखाते प्रमुख

माहिती साठी व कार्यवाही साठी...........

Scanned with OKEN Scanner